तरुण भारत



कोल्हापूर : डॉ. निशा पवार लिखित ग्रंथाचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. पी. एस. पाटील, डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. आर. के. कामत आदी.

# 'माध्यम संशोधक विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक'

प्रतिनिधी
कोल्हापूर

निवडक माध्यमांविषयी संशोधनात्मक लिखान डॉ. निशा पवार यांनी आपल्या ग्रंथात केलेले आहे. हा ग्रंथ माध्यमातील संशोधक विद्यार्थी आणि शिक्षक यांना मार्गदर्शक ठरणार आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील पत्रकारिता व जनसंज्ञापन विभागप्रमुख डॉ. निशा पवार लिखित 'मीडिया रिसर्च इन कंटेम्परररी सोसायटी" या संशोधन ग्रंथाचे प्रकाशन सोहळयात प्रकाशक म्हणून ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, डॉ. निशा पवार यांनी 'मीडिया रिसर्च इन कंटेम्परररी सोसायटी" या ग्रंथाची निर्मिती संशोधनाअंती केली आहे. या ग्रंथात विविध विषयावरील संशोधन लेखांचा संग्रह आहे. हा ग्रंथ धारवाड येथील कर्नाटक विद्यापीठातर्फे प्रकाशित करण्यात आला आहे. ही शिवाजी विद्यापीठासाठी अभिमानाची बाब आहे.

डॉ. निशा पवार यांनी ग्रंथाविषयी सविस्तर माहिती दिली. तसेच त्यांनी आतापर्यंत दहापेक्षा जास्त ग्रंथांचे लेखन केल्याचे सांगितले.

पब्लिक रिलेशन, थिअरॉटिकल डायमेन्शन ऑफ वुमन इन इंडियन प्रिंट मीडिया, वृत्तपत्रीय लेखनाची दोन दशके, संवादशास्त्र, वूमन इन रिजनल टेलीविजन चॅनल्स आदी मराठी आणि इंग्रजी ग्रंथांचा समावेश आहे.

यावेळी प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत उपस्थित होते.

तरूण भारत

# एम. फिल., पीएच. डी. परीक्षा अधिविभाग, महाविद्यालय स्तरावर घेण्याचा निर्णय

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२०–२१ मधील मार्च–एप्रिलमधील उन्हाळी सत्रातील सर्व अभ्यासक्रमाच्या एम. फिल., पीएच. डी. अभ्यासक्रमाच्या परीक्षा कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अधिविभाग व महाविद्यालय स्तरावर घेण्याचा निर्णय अधिकार मंडळाने घेतला आहे. तरी अधिविभाग आणि महाविद्यालय स्तरावर एम. फिल., पीएच. डी.च्या परीक्षेचे आयोजन करावे. या परीक्षा ऑनलाईन वर्णनात्मक पध्दतीने न घेता प्रचलित वर्णनात्मक ऑफलाईन पध्दतीने घ्याव्या. मान्यताप्राप्त प्रश्नपत्रिका नियोजकाकडून प्रश्नपत्रिकेचे सिलबंद तीन संच तयार करून संबंधीत प्राचार्य, अधिविभागप्रमुख, संचालक यांनी त्यापैकी एक संच परीक्षेसाठी निवडावा. परीक्षा विभागाकडून अधिविभाग, महाविद्यालयांना विद्यार्थ्यांची समरी पाठवली जाईल, त्यानुसार विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यात येणार आहे, अशी माहिती विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने प्रसिध्द करण्यात आली आहे.

पुढारी

# उद्यापासून पदवी अभ्यासक्रमांच्या पुनर्परीक्षांना प्रारंभ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने बी.कॉम., बीबीए, बीसीए, बी.एस्सी., बी.टेक., बीएसडब्ल्यू., बी.व्होक., बीओडी, बीआयडी, बीडीएस आदी पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षा गुरुवारपासून (दि. १६) सुरू होणार आहेत. विद्यापीठातर्फे उन्हाळी सत्र परीक्षा तांत्रिक अडचणी आलेल्या विद्यार्थ्यांच्या पदवी व पदव्युत्तरच्या पुनर्परीक्षा १६ व २१ सप्टेंबर रोजी घेण्यात येणार आहेत. परीक्षेची तयारी पूर्ण झाली आहे., अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी दिली.

सकाळ

## » शहराचे फुफ्फुस : अग्रणी वनस्पती उद्यान - भाग ३३




शिवाजी विद्यापीठात लीड बोटॅनिकल गार्डन.

# दुर्मिळ-प्रदेशनिष्ठ वनस्पतींचे जतन, संवर्धन करणारे उद्यान

**कोल्हापूरच्या शिरपेचातील मानाचा तुरा असणारे उद्यान म्हणजे शिवाजी विद्यापीठातील अग्रणी वनस्पती उद्यान. दुर्मिळ, संकटग्रस्त, प्रदेशनिष्ठ वनस्पतींचा खजिना असणारे कोल्हापूर जिल्ह्यातील हे एकमेव उद्यान. अग्रणी वनस्पती उद्यान ही संकल्पना पर्यावरण आणि वन मंत्रालयाने जैवविविधता जतन-संवर्धन करण्याच्या दृष्टीने राबविलेली आहे. भारतामध्ये या मंत्रालयाच्या वित्तीय साह्यातून २०१३ पर्यंत १३ अग्रणी उद्यानांची उभारणी करण्यात आली आहे. भारतातील प्रदेशनिष्ठ (Endemic), संकटग्रस्त व नष्ट (Rare Endangered and Threatened) होत चाललेल्या वनस्पतींच्या जतन, संवर्धन तसेच संशोधन करण्याच्या दृष्टीने अशा वनस्पती उद्यानांचे जाळेच उभारले आहे. जागतिक पातळीवर अशी उद्याने जैवविविधता संवर्धनाचे काम करतात.**

**- डॉ. मकरंद मोहनराव ऐतवडे**

शिवाजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभागातील आंतरराष्ट्रीय कीर्तीचे वनस्पती वर्गीकरण शास्त्रज्ञ डॉ. श्रीरंग रामचंद्र यादव यांच्या अथक परिश्रमाचे फलित म्हणजे हे अग्रणी उद्यान होय. या उद्यानाच्या उभारणीमध्ये त्यांचे सहकारी प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी तसेच माळीवर्गाचा महत्त्वाचा वाटा आहे. विद्यापीठात ४२ एकरांमध्ये विस्तारलेले पश्चिम भारतातील 'पहिले अग्रणी वनस्पती उद्यान (लीड बोटॅनिकल गार्डन)' आहे. या उद्यानात देश-विदेशातील वनस्पती आहेत. याबरोबरच भारतातील सर्वाधिक पाम वृक्ष असणाऱ्या चार उद्यानांपैकी एक उद्यान. त्सुनामीनंतर अंदमान-निकोबार बेटांवरील दुर्मिळ वनसंपदेचे या अग्रणी उद्यानात संवर्धन करण्यात यश प्राप्त झाले आहे. या उद्यानाची प्रमुख कार्ये आपण जाणून घेऊया.

## अग्रणी वनस्पती उद्यानाची प्रमुख कार्ये

- संकटग्रस्त व प्रदेशनिष्ठ वनस्पतींचे जतन आणि संवर्धन करणे
- विविध तंत्रज्ञाने वापरून त्यांची नैसर्गिक अधिवासात पुनर्लागवड करणे
- या वनस्पतींच्या विविध पैलूंवर संशोधन करून अशा वनस्पतींची नामशेष होण्याची कारणे शोधून त्यावर विविध उपाययोजना करून त्या जगविण्याचा प्रयत्न करणे
- संकटग्रस्त व प्रदेशनिष्ठ वनस्पतींच्या पुनर्वसनाचे विविध कार्यक्रम हाती घेणे
- अशा वनस्पतींचा जिवंत आणि शुष्क संग्रह करणे, संकटग्रस्त आणि प्रदेशनिष्ठ वनस्पतींच्या मूलस्थानी आणि परस्थानी जतनासंबंधीची माहिती निर्माण करणे
- वनस्पतींच्या ऋतुजैविकीचा आणि त्यांच्या वातावरणातील परिवर्तनशीलता किंवा बदलाला दिलेल्या प्रतिसादाचा अभ्यास करणे
- वनस्पतींच्या संवर्धनाच्या दृष्टीने प्रजातींचे पुनरुत्पादन आणि त्यांच्या जगण्यामध्ये बाधा आणणाऱ्या पर्यावरणीय, जैविक आणि अनुवांशिक अडथळ्याचा अभ्यास करणे
- आधुनिक संवर्धन पद्धती, जनुक बँकिंग यांसारख्या तंत्रज्ञानाचा वापर करून संबंधित संशोधन आणि विकास कौशल्य विकसित करणे
- निवडक वनस्पतींच्या विविध पैलूंचा अभ्यास करून रेड डेटा शीट्स (Red Data Sheets) आय. यू. सी. एन. (इंटरनॅशनल युनियन फॉर कंझर्व्हेशन ऑफ नेचर) स्वरूपात तयार करणे
- तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली वनस्पतीशास्त्र आणि उद्याननिर्मितीशास्त्र यांचे प्रशिक्षण केंद्र म्हणून काम करणे
- पर्यावरण संरक्षणाचे विविध उपक्रम राबवणे व त्या अनुषंगाने शैक्षणिक साहित्याची निर्मिती करणे
- शैक्षणिक कार्यक्रम आणि शैक्षणिक साहित्य यांच्या माध्यमातून निसर्ग संवर्धनाची पर्यावरण जागरूकता वाढवणे इ.

या उद्यानातील वनस्पती संपदा पाहण्यासाठी विविध ठिकाणांहून अभ्यास सहली येतात. अगदी लहान मुलांच्या शाळेपासून ते महाविद्यालयातील तरुण विद्यार्थी, देश-विदेशातील विविध संस्थांमधील संशोधक या ठिकाणी भेट देण्यासाठी, इथले वनस्पती जतन-संवर्धनाचे काम पाहण्यासाठी येत असतात. वनस्पतीशास्त्र विभागातील संशोधक विद्यार्थी आणि प्राध्यापक या उद्यानाची रीतसर, छान, सहज-सोप्या शब्दात माहिती देतात. अशा या अग्रणी उद्यानास आपण जरूर भेट द्यावी. पुढील भागात आपण अग्रणी वनस्पती उद्यानातील वनसंपदेची माहिती घेणार आहोत.